सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**
**शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय,**
**महाराष्ट्र राज्य,**
**नेताजी सुभाष मार्ग, चर्नी रोड,**
**मुंबई ४०० ००४.**

जाहिरात क्र.०१/२०२३

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. प्रानिमं/१२२/प्र.क्र.५४/का.१३-अ दिनांक ४.५.२०२२ अन्वये शासकीय मध्यवर्ती मुद्रणालयाच्या कार्यालयामधील गट-क संवर्गातील सरळसेवेची रिक्त पदे भरावयाची असून इच्छूक व पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

१. ऑनलाईन अर्ज करण्याचे वेळापत्रक:-

| अ.क्र. | तपशील | दिनांक |
|---|---|---|
| १. | ऑनलाईन पध्दतीने अर्ज नोंदणी सुरु होण्याचा दिनांक | ९ फेब्रुवारी, २०२४ |
| २. | ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याचा व विहित परीक्षा शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक | २९ फेब्रुवारी, २०२४ |

१.१ ऑनलाईन अर्ज https://cdn3.tcsion.com//EForms/configuredHtml/32750/86278/Index.html या लिंकवर दिनांक ०९ फेब्रुवारी, २०२४ सकाळी ११.०० वाजता ते दिनांक २९ फेब्रुवारी, २०२४ रात्रौ ११.५५ पर्यंत या कालावधीत उपलब्ध राहील.

२. **सामाजिक/ समांतर आरक्षण:-** पदांचा सामाजिक/ समांतर आरक्षणाबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे:-

**२.१ कार्यालयाचे नाव :- शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई -०४**

| अ. क्र. | संवर्ग/पदाचे नाव वेतनस्तर | समांतर आरक्षण | | | | | | | | | | भरावयाच्या पदांची एकूण संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रवर्ग | सर्वसाधारण | महिला (३०%) | खेळाडू (५%) | माजी सैनिक (१५%) | अनाथ (१%) | दिव्यांग (४%) | पदवीधर अंशकालीन (१०%) | भूकंपग्रस्त (२%) | प्रकल्पग्रस्त (५%) | |
| १ | सहाय्यक पर्यवेक्षक (बांधणी) Assistant Supervisor (Binding) (वेतनस्तर एस-१०, रु.२९२००-९२३००) एकूण पदे - ५ | अ.जा. (१३%) | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | | अ.ज. (७%) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | | वि.जा.अ ३%) | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | | भ.ज.ब. (२.५%) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | | भ.ज.क. (३.५%) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | | भ.ज.ड. (२%) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | | वि.मा.प्र. (२%) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | | इ.मा.व. (१९%) | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | | आ.दु.घ. (१०%) | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | | अराखीव (३८%) | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | | **एकूण** | **५** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **५** |
| २ | वरिष्ठ मुद्रित शोधक Senior Reader (वेतनस्तर एस-१०, रु.२९२००-९२३००) एकूण पदे- ३ | अ.जा. (१३%) | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | | अ.ज. (७%) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | | वि.जा.अ ३%) | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | | भ.ज.ब. (२.५%) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | | भ.ज.क. (३.५%) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | | भ.ज.ड. (२%) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | | वि.मा.प्र. (२%) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | | इ.मा.व. (१९%) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | | आ.दु.घ. (१०%) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | | अराखीव (३८%) | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | | **एकूण** | **३** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **३** |
| ३ | मुद्रित शोधक (Reader) (वेतनस्तर एस-८, रु.२५५००-८११००) एकूण पदे - १० | अ.जा. (१३%) | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २ |
| | | अ.ज. (७%) | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | | वि.जा.अ ३%) | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | | भ.ज.ब. (२.५%) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | | भ.ज.क. (३.५%) | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | | भ.ज.ड. (२%) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | | वि.मा.प्र. (२%) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | | इ.मा.व. (१९%) | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २ |
| | | आ.दु.घ. (१०%) | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | | अराखीव (३८%) | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २ |
| | | **एकूण** | **७** | **३** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **१०** |

| अ. क्र. | संवर्ग/पदाचे नाव वेतनस्तर | समांतर आरक्षण | | | | | | | | | | भरावयाच्या पदांची एकूण संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रवर्ग | सर्वसाधारण | महिला (३०%) | खेळाडू (५%) | माजी सैनिक (१५%) | अनाथ (१%) | दिव्यांग (४%) | पदवीधर अंशकालीन (१०%) | भूकंपग्रस्त (२%) | प्रकल्पग्रस्त (५%) | |
| ४ | दूरध्वनी चालक Telephone Operator (वेतनस्तर एस-७, रु. २१७००-६९१००) एकूण पदे - १ | अ.जा. (१३%) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | | अ.ज. (७%) | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | | वि.जा.अ ३%) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | | भ.ज.ब. (२.५%) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | | भ.ज.क. (३.५%) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | | भ.ज.ड. (२%) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | | वि.मा.प्र. (२%) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | | इ.मा.व. (१९%) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | | आ.दु.घ. (१०%) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | | अराखीव (३८%) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | | **एकूण** | **१** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **१** |
| ५ | मूळप्रतवाचक Copy Holder (वेतनस्तर एस-६, रु.१९९००-६३२००) एकूण पदे - २ | अ.जा. (१३%) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | | अ.ज. (७%) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | | वि.जा.अ ३%) | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | | भ.ज.ब. (२.५%) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | | भ.ज.क. (३.५%) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | | भ.ज.ड. (२%) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | | वि.मा.प्र. (२%) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | | इ.मा.व. (१९%) | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | | आ.दु.घ. (१०%) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | | अराखीव (३८%) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | | **एकूण** | **२** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **२** |
| ६ | बांधणी सहाय्यकारी (Binding Auxilary) (वेतनस्तर एस-५, रु. १८०००-५६९००) एकूण पदे - ३३ | अ.जा. (१३%) | २ | २ | ० | १ | ० | १ अल्प दृष्टी (LV) | ० | ० | ० | ५ |
| | | अ.ज. (७%) | २ | १ | ० | ० | ० | | ० | ० | ० | ३ |
| | | वि.जा.अ ३%) | १ | ० | ० | ० | ० | | ० | ० | ० | १ |
| | | भ.ज.ब. (२.५%) | १ | ० | ० | ० | ० | | ० | ० | ० | १ |
| | | भ.ज.क. (३.५%) | १ | १ | ० | ० | ० | | ० | ० | ० | २ |
| | | भ.ज.ड. (२%) | १ | ० | ० | ० | ० | | ० | ० | ० | १ |
| | | वि.मा.प्र. (२%) | १ | ० | ० | ० | ० | | ० | ० | ० | १ |
| | | इ.मा.व. (१९%) | ४ | २ | ० | १ | ० | | १ | ० | ० | ८ |
| | | आ.दु.घ. (१०%) | २ | १ | ० | १ | ० | | ० | ० | ० | ४ |
| | | अराखीव (३८%) | २ | २ | ० | १ | ० | | १ | ० | ० | ७ |
| | | **एकूण** | **१७** | **९** | **०** | **४** | **०** | **१** | **२** | **०** | **०** | **३३** |

३. उमेदवार भारतीय नागरिक व महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असावा. उमेदवाराकडे सक्षम प्राधिकाऱ्याने निर्गमित केलेले अधिवास प्रमाणपत्र असणे आवश्यक राहील.

४. **शैक्षणिक अर्हता, अनुभव व ज्ञान** (Educational Qualifications & Experience) :-

४.१ **सहाय्यक पर्यवेक्षक (बांधणी)** Assistant Supervisor (Binding) :-

१. माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण.
२. मुद्रण तंत्रज्ञान पदविका किंवा अक्षर मुद्रण (मुद्रण) प्रमाणपत्र यामधील कोणत्याही शासन मान्यताप्राप्त संस्थेने दिलेले प्रमाणपत्र किंवा संचालनालयाचे चार वर्षाचे शिकाऊ उमेदवारीचे प्रमाणपत्र किंवा शासनाने मान्य केलेली समकक्ष अर्हता.
३. बांधणीच्या विविध प्रकाराचा म्हणजेच बांधणीची कामे, केस मेकींग, केसींग इन, लेजर बांधणी, होलो बॅक, लायब्ररी बांधणी, अर्ध आणि क्वार्टर बांधणी व दुरुस्ती काम इत्यादी कामांचा प्रत्यक्ष अनुभव.
४. स्टॉप आणि थ्रु रुलींग, ऑपरेशन्स ऑफ कटींग, फोल्डींग, सुईंग मशीन, वायर स्टींचिग, पंचिंग, आय लेटींग, हॅण्ड नंबरींग, डाय स्टॅम्पिंग आणि लिफाफे बनविणे यामधील अनुभव.
५. बांधणी विभागातील सर्व यंत्रे चालविण्याचा अनुभव.
६. नामांकित मुद्रणालयातील कामाचा तीन वर्षापेक्षा कमी नाही अशा अनुभवाचे प्रमाणपत्र.

४.२ वरिष्ठ मुद्रित शोधक Senior Reader :-

१. माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण.
२. इंग्रजी, मराठी आणि हिंदी भाषांचे उत्तम ज्ञान आणि वरील नमूद केलेली शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्यानंतर पाच वर्षापेक्षा कमी नाही अशा मोठया मुद्रणालयातील मुद्रित शोधनाच्या अनुभवाचे प्रमाणपत्र.
३. मुद्राक्षरे, मजकुरासाठी मापे, पृष्ठांची मांडणी आणि फॉर्मची रचना यासंबंधीचे पुरेसे ज्ञान.
४. पुस्तकांच्या भागांची मांडणी करणे, मुद्रण प्रत संपादित करणे, मुखपृष्ठ, पुस्तकातील मजकूर व अनुक्रमणिका इत्यादींचे ज्ञान.
५. जलद गतीने कामाचा निपटारा आणि मुद्रित शोधक व जुळारी कामगारांना हाऊस स्टाईल व ले-आऊट इ. तांत्रिक बाबींचे मार्गदर्शन करण्याची क्षमता.

४.३ मुद्रित शोधक Reader :-

१. माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण.
२. इंग्रजी, मराठी आणि हिंदी भाषांचे उत्तम ज्ञान.
३. मुद्राक्षरे, मजकुरासाठी मापे, पृष्ठांची मांडणी आणि फॉर्मची रचना आणि कागदाचे निरनिराळे आकार व दर्जा यासंबंधीचे पुरेसे ज्ञान.
४. श्रुतलेखन आणि भाषांचे ज्ञान.
५. विहित गतीत कामाचा निपटारा करण्याची क्षमता.

४.४ दूरध्वनीचालक Telephone Operator :-

१. माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण.
२. मराठी, इंग्रजी व हिंदी या भाषांमधून उत्तम संभाषण करण्याची क्षमता.
३. दूरध्वनी चालकाचे प्रशिक्षण घेतलेल्या व अनुभव असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

४.५ मूळप्रतवाचक Copy Holder :-

१. माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण.
२. इंग्रजी, हिंदी आणि मराठी या प्रादेशिक भाषेतील हस्तलिखित वाचण्याची क्षमता.
३. श्रुतलेखन, विरामचिन्हे, वर्ण लेखन आणि निबंध लेखन यामध्ये अचूकता.

४.६ बांधणी सहाय्यकारी (Binding Auxilary) :-

१. कोणत्याही शासन मान्य शाळेतून इयत्ता ९ वी उत्तीर्ण.
२. अवजड कामे करण्यासाठी मजबूत शरीरयष्टी आवश्यक राहील.
३. बांधणी प्रक्रियेतील फोल्डींग, गॅदरींग, काऊंटींग, रॅपिंग व लिफाफे तयार करणे इत्यादी कामाचा अनुभव.
४. नामांकित मुद्रणालयातील कामाचा तीन वर्षापेक्षा कमी नाही अशा अनुभवाचे प्रमाणपत्र.
५. बांधणी उदिमातील ३ वर्षे शिकाऊ उमेदवारी पूर्ण केलेल्या उमेदवारांस प्राधान्य.

**टीप :- वरील पदांकरिता उच्च शैक्षणिक अर्हता ग्राह्य समजण्यात येईल.**

५. **वयोमर्यादा:-** अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकास उमेदवाराची वयोमर्यादा गणण्यात येईल.

| अ. क्र. | पदनाम | किमान वय (वर्षे) | खुला प्रवर्ग | मागास वर्गीय | कमाल वयोमर्यादा (वर्षे) | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | खेळाडू/ अनाथ/ आर्थिक दृष्टया दुर्बल घटक | प्रकल्पग्रस्त/ भूकंपग्रस्त दिव्यांग/ स्वातंत्र्य सैनिकांचे पाल्य | माजी सैनिक | | शासकीय कर्मचारी | पदवीधर/ पदविका धारक अंशकालीन उमेदवार |
| | | | | | | | खुला प्रवर्ग | दिव्यांग | | |
| १. | सहायक पर्यवेक्षक बांधणी | १८ | ३८ | ४३ | ४३ | ४५ | सशस्त्र दलातील सेवेचा कालावधी + ३ वर्षे | ४५ | उच्च वयोमर्यादा लागू नाही | ५५ |
| २. | वरिष्ठ मुद्रितशोधक | | | | | | | | | |
| ३. | मुद्रितशोधक | | | | | | | | | |
| ४. | दूरध्वनीचालक | | | | | | | | | |
| ५. | मूळप्रतवाचक | | | | | | | | | |
| ६. | बांधणी सहाय्यकारी | | | | | | | | | |

५.१ खुल्या प्रवर्गातील उमेदवारांकरिता कमाल वयोमर्यादा ३८ वर्षे इतकी राहील. (सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही-२०१५/प्र.क्र.४०४/कार्या.१२, दिनांक २५.४.२०१६)

५.२ मागासवर्गीय उमेदवारांकरिता कमाल वयोमर्यादा ४३ वर्षे इतकी राहील. (सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही-२०१५/प्र.क्र.४०४/कार्या-१२, दिनांक २५.४.२०१६)

५.३ दिव्यांग उमेदवारांकरिता कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे इतकी राहील. (सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक दिव्यांग २०१८/प्र.क्र.११४/१६-अ, दिनांक २९.०५.२०१९)

५.४ खेळाडूंकरिता कमाल वयोमर्यादा ५ वर्षे शिथिलक्षम राहील. तथापि, कोणत्याही प्रवर्गातील उमेदवारांकरिता कमाल वयोमर्यादा ४३ वर्षे इतकी राहील. (शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय क्रमांक राक्रीधो-२००२/प्र.क्र. ६८/क्रीयुसे-२, दिनांक १.०७.२०१६)

५.५ माजी सैनिकांकरिता वयोमर्यादेतील सूट ही सदर उमेदवारांच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवेइतका कालावधी अधिक ३ वर्षे इतकी राहील. तसेच अपंग माजी सैनिकांसाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे इतकी राहील. (सामान्य प्रशासन विभाग शासन शुध्दीपत्रक क्रमांक मासैक-१०१०/प्र.क्र.२७९/१०/१६-अ, दिनांक २०.०८.२०१०)

५.६ प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त उमेदवारांकरिता कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे इतकी राहील. (सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक विकाक-२२१५/प्र.क्र.३३७/१६-अ,दिनांक ४.११.२०१६)

५.७ अनाथ आरक्षणाकरिता अर्ज करणाऱ्या उमेदवारांना अनुसूचित जाती या प्रवर्गातील उमेदवारांकरिता असलेली ४३ वर्षे इतकी कमाल वयोमर्यादा लागू राहील. (महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्रमांक अनाथ-२०१८/प्रक्र.१८२/का-०३, दिनांक २३.०८.२०२१)

५.८ शासकीय कार्यालयामध्ये तीन वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केलेल्या रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये या अनुभवाची नोंद केलेल्या पदवीधर/पदविकाधारक अंशकालीन उमेदवारांकरिता कमाल वयोमर्यादा ५५ वर्षे राहील. (सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक अशंका १९१८/प्र.क्र.५०७/१६-अ, दिनांक ०२.०१.२०१९)

५.९ स्वातंत्र्य सैनिकांचे पाल्यांसाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे इतकी राहील. (सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक निवक-१०१०/प्र.क्र.०८/२०१०/१६-अ, दिनांक ०६.१०.२०१०.)

५.१० महाराष्ट्र शासनाच्या सेवेतील कर्मचाऱ्यांना उच्च वयोमर्यादा लागू नाही.

**६ पदांचे आरक्षण संदर्भात सर्वसाधारण तरतुदी :-**

६.१ पदसंख्या व आरक्षणामध्ये शासनाच्या संबंधित विभागांच्या सूचनेनुसार बदल (कमी / वाढ) होण्याची शक्यता आहे.

६.२ पदसंख्या व आरक्षणामध्ये बदल झाल्यास याबाबतची घोषणा / सूचना वेळोवेळी कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या घोषणा / सूचनांच्या आधारे प्रस्तुत परिक्षेमधून भरावयाच्या पदाकरिता भरती प्रक्रिया राबविण्यात येईल.

६.३ प्रस्तुत जाहिरातीमध्ये नमूद संवर्गामध्ये काही मागास प्रवर्ग व समांतर आरक्षणाची पदे उपलब्ध नाहीत. तथापि, जाहिरात प्रसिध्द झाल्यानंतर तसेच परीक्षेचा निकाल अंतिम करेपर्यंत नव्याने प्राप्त होणाऱ्या मागणीपत्रामध्ये जाहिरातीत नमूद नसलेल्या मागास प्रवर्ग तसेच समांतर आरक्षणाकरीता पदे उपलब्ध होण्याची आणि विद्यमान पदसंख्येमध्ये बदल (कमी /वाढ) होण्याची शक्यता आहे. सदर बदललेली पदसंख्या/ अतिरिक्त मागणीपत्राद्वारे प्राप्त पदे परीक्षेचा निकाल अंतिम करताना विचारात घेतली जाईल. यास्तव परीक्षेच्या जाहिरातीमध्ये पद आरक्षित नसल्यामुळे अथवा पदसंख्या कमी असल्यामुळे परीक्षेसाठी अर्ज सादर केला नसल्याची व त्यामुळे निवडीची संधी वाया गेल्याबाबतची तक्रार नंतर कोणत्याही टप्प्यावर विचारात घेतली जाणार नाही.

६.४ महिलांसाठी आरक्षित पदांकरिता दावा करणाऱ्या उमेदवारांनी महिला आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असल्यास त्यांनी अर्जामध्ये न चुकता महाराष्ट्र अधिवास (Domiciled) असल्याबाबत प्रमाणपत्र सादर करावे. तसेच महाराष्ट्र शासन, महिला व बालविकास विभाग, शासन निर्णय क्र. महिला २०२३/प्र.क्र.१२३/कार्या-२ दि.४ मे २०२३ अन्वये खुल्या गटातील महिलांकरिता आरक्षीत असलेल्या पदावरती निवडीकरिता नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्राची अट रद्द करणेत आलेली आहे. तसेच, अनुसूचित जाती व अनुसुचित जमाती वगळता अन्य मागास प्रवर्गातील महिलांकरिता आरक्षित असलेल्या पदावरील निवडीसाठी दावा करु इच्छिणाऱ्या महिलांना त्या-त्या मागास प्रवर्गासाठी इतर मागासवर्ग व बहुजन कल्याण विभाग तसेच सामान्य प्रशासनाकडून वेळोवेळी विहित करण्यात आल्याप्रमाणे नॉनक्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

६.५ विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क) व भटक्या जमाती (ड) प्रवर्गासाठी आरक्षित असलेली पदे आंतरपरिवर्तनीय असून आरक्षित पदासाठी संबंधित प्रवर्गातील योग्य व पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास अद्ययावत शासन धोरणाप्रमाणे उपलब्ध प्रवर्गातील उमेदवाराचा विचार गुणवत्तेच्या आधारावर करण्यात येईल.

६.६ एखादी जात / जमात राज्य शासनाकडून आरक्षणासाठी पात्र असल्याचे घोषित केली असल्यासच तसेच सक्षम प्राधिकाऱ्याने प्रदान केलेले जात प्रमाणपत्र (Caste Certificate) उमेदवारावकडे अर्ज करतानाच उपलब्ध असेल तर संबंधित जात / जमातीचे उमेदवार आरक्षणाच्या दाव्यासाठी पात्र असतील.

६.७ समांतर आरक्षणाबाबत शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग क्र.एस आरव्ही-१०१२/प्र.क्र.१६/१२/१६-अ दि.१३ ऑगस्ट २०१४ तसेच शासन शुध्दीपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र.संकीर्ण-१११८/प्र.क्र.३९/१६-अ, दि.१९ डिसेंबर २०१८ आणि तद्नंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

६.८ शासन परिपत्रक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, सीबीसी-२०१२/प्र.क्र.१८२/विजाभज-१, दि.२५ मार्च, २०१३ अन्वये विहित कार्यपध्दतीनुसार तसेच शासन शुध्दीपत्रक संबंधित जाहिरातीमध्ये नमूद अर्ज स्वीकारण्याचा अंतिम दिनांक संबंधित उमेदवार उन्नत आणि प्रगत व्यक्ती / गटामध्ये मोडत नसल्याबाबतची पडताळणी करण्यासाठी गृहित धरण्यात येईल.

६.९ शासन परिपत्रक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, सीबीसी-२०१३/प्र.क्र.१८२/विजाभज-१, दि.१७ ऑगस्ट, २०१३ अन्वये जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार उन्नत आणि प्रगत व्यक्ती / गट यामध्ये मोडत नसल्याचे नॉन- क्रिमीलेअर प्रमाणपत्राच्या वैधतेचा कालावधी विचारात घेण्यात येईल.

६.१० सेवा प्रवेशाच्या प्रयोजनासाठी शासनाने मागास म्हणून मान्यता दिलेल्या समाजाच्या वयोमर्यादेमध्ये सवलत घेतलेल्या उमेदवारांचा अराखीव (खुला) पदावरील निवडीकरीता विचार करणेबाबत शासनाच्या धोरणानुसार कार्यवाही करण्यात येईल. याबाबतचा तपशील कालावधी विचारात घेण्यात येईल.

६.११ अराखीव (खुला) उमेदवारांकरीता विहित केलेल्या वयोमर्यादा तसेच इतर पात्रता विषयक निकषासंदर्भातील अटींची पुर्तता करणाऱ्या सर्व उमेदवारांचा (मागासवर्गीय उमेदवारांसह) अराखीव (खुला) सर्वसाधारण पदावरील शिफारशीकरीता विचार होत असल्याने, सर्व आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांनी त्यांच्या प्रवर्गासाठी पद आरक्षित / उपलब्ध नसले तरी, अर्जामध्ये त्यांच्या मूळ प्रवर्गासंदर्भातील माहिती अचूकपणे नमूद करणे बंधनकारक आहे.

६.१२ कोणत्याही प्रकारच्या आरक्षणाचा लाभ हा केवळ महाराष्ट्राचे सर्वसामान्य रहिवासी असणाऱ्या उमेदवारांना उनुज्ञेय आहे. सर्वसामान्य रहिवासी या संज्ञेला भारतीय लोकप्रतिनिधित्व कायदा १९५० च्या कलम २० अनुसार जो अर्थ आहे तोच अर्थ असेल.

६.१३ कोणत्याही प्रकारच्या आरक्षणाचा (सामाजिक अथवा समांतर) अथवा सोयी सवलतींचा दावा करणाऱ्या उमेदवाराकडे संबंधित कायदा / नियम / आदेशानुसार विहित नमुन्यातील प्रस्तुत जाहिरातीस अनुसरुन अर्ज स्वीकारण्यासाठी विहित केलेल्या दिनांकापूर्वीचे वैध प्रमाणपत्र उपलब्ध असणे अनिवार्य आहे.

६.१४ सामाजिक व समांतर आरक्षणासंदर्भात विविध न्यायालयामध्ये दाखल न्यायप्रविष्ट प्रकरणी अंतिम निर्णयाच्या अधीन राहून पदभरतीची कार्यवाही करण्यात येईल.

## ७. आरक्षण:-

### ७.१ दिव्यांग आरक्षण:-

i) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक: दिव्यांग २०२१/प्र.क्र.४७/उद्योग-४, दिनांक २८.०४.२०२१ नुसार संबंधित पदे दिव्यांगांसाठी सुनिश्चित करण्यात आली आहेत.

ii) दिव्यांग आरक्षणाची गणना ही संबंधित नियुक्ती प्राधिकाऱ्याच्या अधिकार क्षेत्रातील संबंधित संवर्गाच्या भरावयाच्या एकूण पदांवर करण्यात आली आहे. त्यानुसार दिव्यांगांकरिता उपलब्ध पदे, दिव्यांग प्रवर्ग व आवश्यक शारिरीक पात्रता यांचा तपशील संबंधित पदाच्या आरक्षणानिहाय तपशिलाखाली दर्शविण्यात आला आहे. तसेच दिव्यांग उमेदवारांनी संबंधित पदाच्या पार पाडावयाच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या यांचा संक्षिप्त तपशील उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक: दिव्यांग २०२१/प्र.क्र.४७/उद्योग-४, दिनांक २८.०४.२०२१ मध्ये दर्शविण्यात आला आहे.

iii) दिव्यांग आरक्षणाच्या पात्रतेकरिता दिव्यांगत्वाचे प्रमाण किमान ४०% असणे आवश्यक आहे.

iv) दिव्यांगाकरिता आरक्षित पदावर गुणवत्तेनुसार निवड झालेल्या उमेदवारांचा समावेश, उमेदवार ज्या सामाजिक प्रवर्गाचा असेल त्या प्रवर्गात करण्यात येईल.

v) दिव्यांगांच्या नियुक्तीसाठी पात्र ठरविण्यात आलेल्या पदावर दिव्यांग व्यक्ती गुणवत्तेच्या आधारावर निवडीस पात्र ठरत असल्यास व त्यांचेसाठी पद आरक्षित नसले तरी निवडीसाठी अपात्र ठरविण्यात येत नाही.

vi) सर्वसाधारण उमेदवारांप्रमाणे तसेच प्रचलित नियमाप्रमाणे दिव्यांग उमेदवारांना देण्यात आलेल्या सवलतीचा लाभ न घेता एखाद्या पदावर निवड झाली असेल तर अशा दिव्यांग उमेदवारांची गणना दिव्यांगांसाठी आरक्षित पदावर करण्यात येत नाहीत व दिव्यांगासाठी आरक्षित पद/पदे इतर दिव्यांग उमेदवारांमधून भरण्यात येतील.

vii) दिव्यांग उमेदवार एखाद्या सामाजिक प्रवर्गातील असल्यास संबंधित सामाजिक प्रवर्गामध्ये गुणवत्तेनुसार निवडीसाठी पात्र ठरण्यासाठी व परीक्षा शुल्कामधील सवलतीकरिता संबंधित जातीचे वैध कालावधीचे नॉन क्रिमीलेयर (लागू असल्यास) प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

viii) दिव्यांग आरक्षणसंदर्भात शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णय/परिपत्रकानुसार कार्यवाही करण्यात येईल. दिव्यांगांकरिता पुरेशा प्रमाणात पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर अनुशेष पुढील वर्षात दर्शविण्यात येईल. (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन शुध्दीपत्रक क्रमांक अपंग-२०१३/प्र.क्र.३५/ अ.क्र.२, दिनांक १५.७.२०१३)

ix) दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ च्या आधारे शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : दिव्यांग २०१८/प्र.क्र.११४/१६ अ, दिनांक २९ मे, २०१९ तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार दिव्यांग व्यक्तींच्या आरक्षणासंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

### ७.२ अनाथ आरक्षण:-

i) महिला व बाल विकास विभागाकडून ज्या अनाथ मुलांना अनाथ प्रमाणपत्र देण्यात आलेली आहेत अशी बालके आरक्षणासाठी पात्र राहतील. तथापि, ज्या अनाथ मुलांच्या आईवडिलांचे निधन त्या मुलाच्या वयाची १८ वर्षे पूर्ण होण्यापूर्वी झाले असेल अशाच बालकांना आरक्षण अनुज्ञेय राहील.

ii) अनाथांसाठी आरक्षित पदावर गुणवत्तेनुसार निवड झालेल्या उमेदवारांचा समावेश तो ज्या प्रवर्गाचा आहे त्या प्रवर्गात होईल.

iii) अनाथ आरक्षणाचा लाभ घेऊन शासन सेवेत रुजू होणाऱ्या उमेदवाराला अनाथ प्रमाणपत्र पडताळणीच्या अधीन राहून तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्यात येईल.

iv) अनाथालयात दाखल करण्यात येणाऱ्या काही बालकांची जात माहीत नसताना त्यांच्या शैक्षणिक प्रवेशासाठी अंदाजे जात नमूद केल्याचे निदर्शनास येते. अशा बालकांच्या जात प्रमाणपत्राची वैधता होऊ शकत नसल्यास सदर उमेदवारास पदभरतीनंतर खुल्या प्रवर्गात दर्शविण्यात येईल. अनाथ व्यक्तींचे आरक्षण शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्रमांक अनाथ-२०१८/प्र.क्र.१८२/का-०३, दिनांक २३.०८.२०२१ तसचे या संदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणाऱ्या आदेशानुसार राहील.

**७.३ महिला आरक्षण:-**

i) महिलांसाठी समांतर आरक्षणाच्या अनुषंगाने शासनाकडून विशेष तरतूदी करण्यात आल्या असून महिलांना त्यांच्याशी संबंधित सामाजिक प्रवर्गाच्या तरतूदीं व्यतिरिक्त सदरच्या तरतूदी या अतिरिक्त आहेत.

ii) अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळता इतर सामाजिक प्रवर्गातील उन्नत व प्रगत गटातील महिलांना महिलांकरिताचे समांतर आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही.

iii) महिला उमेदवारांना वय, परीक्षा शुल्क इत्यादी तरतूदी त्यांच्यांशी संबंधित सामाजिक प्रवर्गातील उमेदवारांप्रमाणेच राहतील.

iv) मागास प्रवर्गातील महिलांसाठी आरक्षित पदांवर दावा करणाऱ्या उमेदवारांनी सक्षम प्राधिकाऱ्याने निर्गमित केलेले जात प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

v) मागासवर्गीय व्यक्तींशी आंतरजातीय विवाह केलेल्या उमेदवारांना त्यांच्या स्वत: च्या मूळ प्रवर्गानुसार सवलती देय असतील.

vi) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व आर्थिकदृष्या मागास प्रवर्गातील महिलांना नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र सादर करण्याची आवश्यकता नाही.

vii) विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क) भटक्या जमाती (ड) इतर मागास प्रवर्ग, विशेष मागासवर्ग या मागास प्रवर्गातील महिलांनी त्यांच्या संबंधित प्रवर्गाच्या आरक्षणाकरिता आवश्यक असलेले नॉन-क्रिमिलेयर प्रमाणपत्र सादर केल्यास त्यांना महिलांसाठी आरक्षणाकरीता पात्र समजण्यात येईल.

viii) मागास प्रवर्गातील महिला उमेदवार अमागास महिलांसाठी आरक्षित पदावरील निवडीकरिता पात्र ठरल्यास:-

१) अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील महिलांकडे जात प्रमाणपत्र असल्यास कोणतेही नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र सादर करण्याची आवश्यकता नाही.

२) विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड) इतर मागास प्रवर्ग, विशेष मागास प्रवर्ग या मागास प्रवर्गातील महिला उमेदवारांच्या बाबतीत त्यांच्या संबंधित मागास प्रवर्गाच्या आरक्षणाकरिता आवश्यक असलेले नॉन- क्रिमीलेयर प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येईल.

३) अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळता अन्य मागास प्रवर्गातील महिला उमेदवारांच्या बाबतीत विवाहापूर्वी नांव अंतर्भूत असलेली क्रिमीलेयरमध्ये मोडत नसल्याबाबतची प्रमाणपत्रे ग्राह्य धरण्यात येतील.

ix) विधवा/घटस्फोटित/परित्यक्त्या महिलांच्या बाबतीत :-

१. विधवा महिलेच्या बाबतीत ती स्वतंत्र राहत असल्यास पतीच्या निधनामुळे प्राप्त झालेले उत्पन्न तसेच तिचे स्वत:चे उत्पन्न ग्राह्य धरुन वितरित केलेले नॉन- क्रिमीलेयर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

२. घटस्फोटीत महिलेच्या बाबतीत तिच्या भूतपूर्व पतीकडून मा. न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार मिळणाऱ्या पोटगीची रक्कम व तिचे स्वत:चे उत्पन्न ग्राह्य धरुन वितरित केलेले नॉन- क्रिमीलेयर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

३. कौटुंबिक हिंसाचार अधिनियम-२००५ अन्वये मा. न्यायालयात याचिका दाखल झालेली महिला स्वतंत्र राहत असल्यास अशा महिलेचे तिचे स्वत:चे उत्पन्न किंवा अशी महिला नोकरी करीत नसल्यास तिच्या वडिलांचे उत्पन्न नॉन- क्रिमीलेयर प्रमाणपत्राकरिता ग्राह्य धरुन वितरित नॉन- क्रिमीलेयर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

**७.४ खेळाडू-**

i) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय, क्रमांक राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १.०७.२०१६ रोजीच्या शासन निर्णयातील परिशिष्ट-अ मध्ये नमूद तसेच दिनांक १०.१०.२०१७ व १५.११.२०१७ च्या शासन शुध्दीपत्रकान्वये सुधारित केलेल्या स्पर्धा/खेळांमध्ये प्राविण्य प्राप्त केलेले व सदर शासन निर्णयातील क्रीडा विषयक अर्हता, सर्वसाधारण अर्हता, अटी व शर्तींची पूर्तता करणारे खेळाडू सदर आरक्षणाचा लाभ घेण्यास पात्र ठरतील.

ii) शासन शुध्दीपत्रक, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, क्रमांक : राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १८ ऑगस्ट, २०१६, तसेच शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, क्रमांक : संकीर्ण-१७१६/प्र.क्र.१८/क्रियुसे-२, दिनांक ३० जून, २०२२ आणि तदनंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार प्राविण्य प्राप्त खेळाडू आरक्षणासंदर्भात तसेच वयोमर्यादेतील सवलतीसंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

iii) खेळाडू उमेदवाराने अर्ज करण्यापूर्वी विभागीय उप संचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य यांचेकडून खेळाच्या प्रमाणपत्राची पडताळणी करुन घेणे आवश्यक राहील अन्यथा सदर उमेदवारास खेळाडू करिता राखीव पदावर नियुक्ती अनुज्ञेय राहणार नाही.

iv) खेळाडू आरक्षणाकरिता नॉन-क्रिमिलेयर प्रमाणपत्र सादर करण्याची अट लागू राहणार नाही.

v) मागास प्रवर्गातील खेळाडू उमेदवार यांना त्यांच्या सामाजिक प्रवर्गातील दाव्यांच्या अनुषंगाने जात प्रमाणपत्र (लागू असल्यास वैध नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्रासह) सादर करणे आवश्यक राहील.

**७.५ प्रकल्पग्रस्त व भूकंपग्रस्त:-**

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : एईएम-१०८०/३५/१६ अ, दिनांक २१ जानेवारी,१९८० तसेच शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : भूकंप-१००९/प्र.क्र.२०७/२००९/१६ अ, दिनांक २७ ऑगस्ट, २००९ या संदर्भात शासनाकडून वेळोवेळी नमूद करण्यात येणाऱ्या आदेशानुसार प्रकल्पग्रस्त व भूकंपग्रस्तांसाठीचे आरक्षण राहील.

**७.६ पदवीधर/पदविकाधारक अंशकालीन उमेदवार:-**

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : पअंक-१००९/प्र.क्र.२००/२००९/१६-अ, दिनांक २७ ऑक्टोबर, २००९ तसेच या संदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणाऱ्या आदेशानुसार पदवीधर/ पदविकाधारक अंशकालीन उमेदवारांचे आरक्षण राहील.

**७.७ माजी सैनिक:-**

i) माजी सैनिकांसाठी असलेल्या वयोमर्यादा व आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांनी विहित नमुन्यात सक्षम प्राधिकाऱ्याने निर्गमित केलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

ii) उमेदवार ज्या सामाजिक प्रवर्गातील असेल त्या प्रवर्गासंबंधीचे जात प्रमाणपत्र तसेच नॉन क्रिमिलेयर प्रमाणपत्र (लागू असल्यास) सादर करणे आवश्यक राहील.

iii) माजी सैनिकांसाठी आरक्षित पदावर राज्य शासनाच्या सेवेमध्ये गट-क व गट-ड मधील पदावर एकदा नियुक्ती झाल्यानंतर तो धारण करीत असलेल्या पदापेक्षा उच्चश्रेणी वा अन्य संवर्गातील नियुक्तीसाठी माजी सैनिक म्हणून राज्य शासनाच्या सेवेत असलेल्या आरक्षणाचा लाभ मिळणार नाही.

iv) राज्य शासनाच्या सेवेत रुजू होण्यापूर्वी अर्ज केलेल्या पदाकरिता निवड झाली असल्यास व त्याबाबतची सविस्तर माहिती लेखी स्वयंघोषपत्राने राज्य शासनाच्या सेवेत रुजू होताना त्याने नियुक्ती प्राधिकाऱ्यास दिली असल्यास त्यास स्वयंघोषणापत्रामध्ये नमूद केलेल्या व माजी सैनिकांचे समांतर आरक्षणाचे तत्त्व लागू असलेल्या पदांकरिताच माजी सैनिकाच्या आरक्षणाचा लाभ घेता येईल.

v) बडतर्फी, गैरवर्तणूक, अकार्यक्षमता या कारणांसाठी अथवा सैनिकी सेवेसाठी शारिरीक क्षमता नसल्याने किंवा आजारपणामुळे सेवा संपुष्टात आलेले माजी सैनिक वयोमर्यादेच्या सवलतीसाठी पात्र ठरणार नाही.

vi) गट-क व गट-ड मधील पदावर एकदा नियुक्ती झाल्यानंतर तो धारण करीत असलेल्या पदापेक्षा उच्च श्रेणी वा अन्य संवर्गातील नियुक्तीसाठी माजी सैनिक म्हणून अनुज्ञेय ठरविण्यात आलेल्या वयोमर्यादेची सूट सदर नवीन नियुक्तीसाठी देखील अनुज्ञेय राहील.

**७.८ आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील उमेदवार (आ.दु.घ.)**

i) आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांतील (ईडब्लूएस) उमेदवारांकरीता शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६ अ, दिनांक १२ फेब्रुवारी, २०१९ व दिनांक ३१ मे, २०२१ अन्वये विहित करण्यात आलेले प्रमाणपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

ii) राज्याच्या दुर्बल घटकांतील ज्या व्यक्तींच्या जातींचा शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार घोषित मागासवर्गीयांमध्ये समावेश नसेल अशा उमेदवारांना आर्थिकदृष्टया दुर्बल घटकासाठीच्या आरक्षणाचा लाभ अनुज्ञेय आहे.

iii) कुटूंबाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न शासनाकडून विहित करण्यात आलेल्या मर्यादेच्या आत असणाऱ्या उमेदवारास आर्थिकदृष्टया दुर्बल समजण्यात येईल व सदर आरक्षणाच्या लाभासाठी तो पात्र असेल.

iv) सदर आरक्षणाच्या प्रयोजनार्थ "कुटूंब" म्हणजे उमेदवाराचे आई-वडील व १८ वर्षापेक्षा कमी वयाची भावंडे तसेच उमेदवाराची १८ वर्षांपेक्षा कमी वयाची मुले व पती/पत्नी यांचा समावेश होईल.

v) "कुटूंबाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न" यामध्ये कुटूंबातील सर्व सदस्यांच्या सर्व स्त्रोतामधून म्हणजेच वेतन, कृषी उत्पन्न, उद्योग व्यवसाय व इतर सर्व मार्गातून मिळणाऱ्या उत्पन्नाचा समावेश असेल.

vi) आर्थिकदृष्टया दुर्बल घटकाच्या पात्रतेसाठी संबंधित तहसीलदार यांनी वितरित केलेले व राज्य शासकीय सेवा व शैक्षणिक संस्थांच्या प्रवेशाकरिता राज्य शासनाच्या प्रमाणपत्राचा नमुना वापरणे आवश्यक राहील.

vii) केंद्रीय सेवांचा लाभ घेण्यासाठीच्या आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांचे प्रमाणपत्र, राज्य शासकीय सेवांसाठीच्या पदभरतीकरिता वापरता येणार नाही.

८ **जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्रः-** अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क) ,भटक्या जमाती (ड), विशेष मागास प्रवर्ग, इतर मागासवर्गीय उमेदवारांना संबंधित आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असल्यास सक्षम प्राधिकाऱ्याने निर्गमित केलेले जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

९ **अनुभवः-** उमेदवाराने अनुभवासंदर्भातील प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक राहील. रोजंदारी, कार्यव्ययी, करार पध्दतीवर, मानधन इ. स्वरुपात केवळ पूर्णवेळ काम केले असल्यासच असा कालावधी अनुभव म्हणून ग्राह्य धरण्यात येईल. तासिका, नियतकालिक, अंशकालीन, विद्यावेतन, अभ्यागत, अंशदानात्मक, विनावेतन तत्त्वावर केलेल्या अंशकालीन सेवेचा तसेच प्रभारी म्हणून नेमणूकीचा कालावधी तसेच अतिरिक्त कार्यभाराचा कालावधी अनुभवासाठी ग्राह्य धरला जाणार नाही. (सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्रमांक एसआरव्ही-२००४/प्र.क्र. १०/०४/१२, दिनांक ०३.०७.२००४)

१० **अनुभव प्रमाणपत्र :-** नोंदणीकृत (शॉप ॲक्ट, जी.एस.टी. व तत्सम नोंदणी) असलेल्या मुद्रणालयाचे अनुभवाचे प्रमाणपत्र आवश्यक आहे. अनुभव प्रमाणपत्रावर नोंदणी क्रमांक नमुद असणेही अनिवार्य आहे. अनुभव प्रमाणपत्रात संबंधीत पदाच्या कामाचा अनुभव, मासीक वेतन, इत्यादींचा समावेश असावा.

११ **लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापनः-** महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम, २००५ मधील तरतूदीनुसार हयात असलेल्या अपत्यांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर, दिनांक २८.०३.२००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या अपत्यामुळे उमेदवार शासकीय सेवेतील नियुक्तीसाठी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल. या नियमातील व्याख्येनुसार लहान कुटूंब यांचा अर्थ, दोन अपत्ये यांसह पत्नी व पती असा आहे. उमेदवाराने नियुक्तीच्या वेळी लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन सादर करणे आवश्यक राहील.

१२ **महाराष्ट्र कर्नाटक सीमा भागातील उमेदवारः-** महाराष्ट्र शासनाने दावा सांगितलेल्या सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र. मकसी-१००७/प्र.क्र.३६/का.३६, दिनांक १०.७.२००८ मध्ये नमूद ८६५ गावातील मराठी भाषिक उमेदवार हे सेवा प्रवेश नियमातील सर्व अटींची पूर्तता करीत असल्यास, ते अर्ज करण्यास पात्र राहतील. सदर उमेदवारांनी त्यांच्या सदर ८६५ गावांमधील वास्तव्याबाबतचा सक्षम प्राधिकाऱ्यांचा विहित नमुन्यातील दाखला सादर करणे अनिवार्य राहील. सदर उमेदवारांना सामाजिकदृष्टया मागास प्रवर्गापैकी कोणत्याही प्रवर्गाचा लाभ अनुज्ञेय राहणार नाही.

१३ **परीक्षेचे स्वरूपः-** लेखी परीक्षा व व्यावसायिक चाचणीचे गुण

| अ.क्र. | पदनाम | लेखी परिक्षेचे गुण | व्यावसायिक चाचणी गुण | शारीरीक क्षमता गुण | एकूण गुण |
|---|---|---|---|---|---|
| १. | सहाय्यक पर्यवेक्षक बांधणी | १२० | ८० | -- | २०० |
| २. | वरिष्ठ मुद्रितशोधक | १२० | ८० | -- | २०० |
| ३. | मुद्रितशोधक | १२० | ८० | -- | २०० |
| ४. | दूरध्वनीचालक | १२० | ८० | -- | २०० |
| ५. | मूळप्रतवाचक | १२० | ८० | -- | २०० |
| ६. | बांधणी सहाय्यकारी | -- | ६० | ४० | १०० |

१४ लेखी परीक्षेचे स्वरुप खालीलप्रमाणे राहील.

| अ.क्र. | पदनाम | विषयनिहाय प्रश्न संख्या | दर्जा | माध्यम | एकूण प्रश्न संख्या | प्रत्येक प्रश्नासाठी गुण | एकूण गुण | कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | सहायक पर्यवेक्षक बांधणी | १) मराठी (१५)<br>२) इंग्रजी (१५)<br>३) बौध्दिक चाचणी/ अंकगणित (१५)<br>४) सामान्य ज्ञान (१५) | माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (S.S.C.) | मराठी व इंग्रजी | ६० | २ | १२० | १ तास (६० मिनिटे) |
| २. | वरिष्ठ मुद्रित शोधक | | | | | | | |
| ३. | मुद्रित शोधक | | | | | | | |
| ४. | मूळप्रतवाचक | | | | | | | |
| ५. | दूरध्वनी चालक | | | | | | | |

१४.१ व्यावसायिक चाचणी परीक्षेचे स्वरुप.

परिच्छेद क्र.४.१ ते ४.६ मधील पदांची नमुद केलेली तांत्रिक अर्हता, अनुभव व ज्ञान या आधारीत व्यावसायिक चाचणीचे स्वरुप असेल तसेच परिच्छेद क्र. ४.६ वरील पदाची अवजड कामे करण्यासाठी आवश्यक शारीरीक क्षमता आधारीत शारीरीक चाचणीचे स्वरुप असेल.

१५ लेखी परीक्षा/ व्यावसायिक चाचणी :-

१५.१ जाहिरातीमधील पदाकरिता लेखी परीक्षा/व्यावसायिक चाचणी घेण्यात येईल. उमेदवाराने अर्जात नमूद केलेल्या माहितीच्या आधारे मूळ प्रमाणपत्र/दस्तऐवज यांची पडताळणी करण्याच्या अटीस अधीन राहून उमेदवारास लेखी परीक्षा/व्यावसायिक चाचणीकरिता उपस्थित राहण्याची परवानगी देण्यात येईल. परीक्षेस उपस्थित राहण्यास उमेदवारास परवानगी दिली याचा अर्थ उमेदवार सदर पदाकरिता पात्र आहे असा होत नाही.

i) परिच्छेद क्र.१३ मधील अनुक्रमांक १ ते ५ या पदांकरिता १२० गुणांची लेखी परीक्षा व ८० गुणांची व्यावसायिक चाचणी घेण्यात येईल. लेखी परीक्षेत ४५% किंवा त्यापेक्षा अधिक गुण प्राप्त केलेल्या उमेदवारांची व्यावसायिक चाचणी घेण्यात येईल. लेखी परीक्षा तसेच व्यावसायिक चाचणीकरिता उपस्थित राहिलेल्या व एकूण गुणांच्या (२०० गुण) ४५% किंवा त्यापेक्षा अधिक गुण प्राप्त केलेल्या तसेच विहित शैक्षणिक अर्हता, अनुभव व अन्य आवश्यक अर्हता धारण केलेल्या उमेदवारांचा गुणवत्ता यादीकरिता विचार केला जाईल.

ii) परिच्छेद क्र.१३ मधील अनुक्रमांक ६ वरील बांधणी सहाय्यकारी या पदाकरिता ६० गुणांची व्यावसायिक चाचणी परीक्षा व शारीरीक क्षमता चाचणी ४० गुणांची घेण्यात येईल. व्यावसायिक चाचणी परीक्षा व शारीरीक क्षमता चाचणी या दोन्ही परीक्षेत एकुण ४५% किंवा त्यापेक्षा अधिक गुण मिळविणारे उमेदवारामधून अंतिम गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल.

१५.२ लेखी परीक्षा एकापेक्षा जास्त सत्रात (Multi Sessions) झाल्यास Normalition-Mean Standard Deviation Method नुसार उमेदवारांचे लेखी परीक्षेतील गुण निश्चित करण्यात येऊन निकाल जाहीर करण्यात येईल.

१५.३ परिच्छेद क्र.१३ मधील अनुक्रमांक १ ते ५ या पदांकरिता लेखी परीक्षेत (परीक्षा एकापेक्षा जास्त सत्रात (Multiple Sessions) झाल्यास Normalization-Mean Standard Deviation Method नुसार) किमान ४५ टक्के किंवा त्या पेक्षा अधिक गुण प्राप्त केलेल्या उमेदवारांचा गुणवत्ता यादीकरिता विचार करण्यात येईल. तसेच अनुक्रमांक ६ वरील बांधणी सहाय्यकारी या पदाकरीता व्यावसायिक चाचणी व शारीरीक क्षमता चाचणी परीक्षेत एकूण ४५ टक्के किंवा त्या पेक्षा अधिक गुण प्राप्त केलेल्या उमेदवारांचा गुणवत्ता यादी करीता विचार करण्यात येईल.

१५.४ परिच्छेद क्र.१३ मधील अनुक्रमांक १ ते ५ या पदाकरिता लेखी परीक्षेत (परीक्षा एकापेक्षा जास्त सत्रात (Multiple Sessions) झाल्यास Normalization-Mean Standard Deviation Method नुसार) किमान ४५ टक्के किंवा त्यापेक्षा अधिक गुण प्राप्त केलेल्या उमेदवारांची व्यावसायिक चाचणी घेण्यात येईल. ४५ टक्क्यांपेक्षा कमी गुण प्राप्त केलेले उमेदवार व्यावसायिक चाचणी तसेच पुढील भरती प्रक्रियेकरिता पात्र राहणार नाहीत. तसेच अनुक्रमांक ६ वरील बांधणी सहाय्यकारी या पदाकरीता व्यावसायिक चाचणी व शारीरीक क्षमता चाचणी परीक्षेत एकूण ४५ टक्के किंवा त्यापेक्षा अधिक गुण प्राप्त केलेल्या उमेदवारांचा गुणवत्ता यादी करीता विचार करण्यात येईल.

१५.५ परिच्छेद क्र.१३ मधील अनुक्रमांक १ ते ५ या पदाकरिता घेण्यात येणाऱ्या व्यावसायिक चाचणी परीक्षा ही ८० गुणांची राहील. पदाच्या शैक्षणिक/तांत्रिक अर्हतेशी संबंधीत व्यावसायिक चाचणी परीक्षेचे स्वरुप असेल.

१५.६ ज्या उमेदवारांनी एकापेक्षा अधिक पदांकरिता अर्ज केला असेल अशा उमेदवारांनी त्या-त्या पदांकरिता असलेली व्यावसायिक चाचणी देणे आवश्यक राहील. उमेदवार संबंधित पदाच्या व्यावसायिक चाचणीकरिता अनुपस्थितीत राहिल्यास त्या पदाच्या निवड प्रक्रियेकरिता उमेदवाराच्या नावाचा विचार केला जाणार नाही.

१५.७ परिच्छेद क्र.१३ मधील अनुक्रमांक १ ते ५ पदांबाबत लेखी परीक्षा व व्यावसायिक चाचणी या दोन्ही परीक्षांकरिता उपस्थित असलेल्या व एकूण २०० गुणांपैकी किमान ४५ टक्के गुण प्राप्त केलेल्या उमेदवारांचा गुणवत्ता यादीकरिता विचार करण्यात येईल. तसेच अ.क्र.६ पदाबाबत व्यावसायिक चाचणी व शारीरीक क्षमता चाचणीमध्ये प्राप्त केलेल्या गुणांचा गुणवत्ता यादीकरीता विचार करण्यात येईल.

१५.८ सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्रमांक एसआरव्ही-१०१२/प्र.क्र.१६/१२/१६-अ, दिनांक १३.८.२०१४ व त्यानुषंगाने राज्य शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णय/शुध्दीपत्रक /परिपत्रक इत्यादी मधील तरतुदीनुसार उमेदवारांची गुणवत्ता यादी (Merit List) तयार करण्यात येईल.

१५.९ **प्राधान्यक्रम :-** ज्या पात्र उमेदवारांचे एकूण गुण समान असतील अशा उमेदवारांचा गुणवत्ता यादीतील प्राधान्यक्रम पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात येईल.

i) आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांचा पाल्य असल्यास प्राधान्य देण्यात येईल. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याचा पाल्य म्हणजे महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र. एससीवाय-१२०५/प्र.क्र.१८९/म-७, दिनांक २३.१.२००६ अन्वये गठित करण्यात आलेल्या जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समितीने ज्या कुटूंबास शेतकऱ्याच्या आत्महत्याप्रकरणी मदतीसाठी पात्र ठरविले असेल अशा कुटूंबातील मृत शेतकऱ्याचा पाल्य (पत्नी/मुलगे/मुलगी)

ii) उपरोक्त (i) मधील अटी देखील समान ठरत असल्यास अथवा उमेदवार आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याचा पाल्य नसल्यास वयाने ज्येष्ठ असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

iii) उपरोक्त (i) व (ii) मधील अटी देखील समान ठरत असल्यास अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास उच्चस्तर शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या उमेदवारास प्राधान्यक्रम देण्यात येईल.

iv) शैक्षणिक अर्हता (i), (ii) व (iii) अटी देखील समान ठरत असल्यास पदाच्या सेवाप्रवेश नियमामध्ये विहित केलेल्या किमान शैक्षणिक अर्हतेमध्ये उच्चस्तर गुण प्राप्त केलेल्या उमेदवारास प्राधान्यक्रम देण्यात येईल.

१५.१० गुणवत्ता यादीतील उमेदवारांना मूळ प्रमाणपत्रे, कागदपत्रे पडताळणीकरिता बोलाविण्यात येईल. प्रमाणपत्रे, कागदपत्रे पडताळणीच्या वेळी उमेदवाराने संबंधित मूळ प्रमाणपत्रे, कागदपत्रे, ओळखपत्रे व त्याच्या दोन स्वस्वाक्षांकित प्रतींसह उपस्थित राहणे आवश्यक राहील. राज्य शासनाने वेळोवळी दिलेल्या निदेशाच्या अनुषंगाने आवश्यक ती प्रमाणपत्रे संबंधित प्राधिकरणास पडताळणीकरिता पाठविण्यात येतील व उमेदवारांची प्रथम तात्पुरती निवडसूची (Provisional Selection List) संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. मूळ प्रमाणपत्रे, कागदपत्रे तपासणीच्यावेळी उमेदवार विहित शैक्षणिक अर्हता, अनुभव अथवा दोन्ही धारण करीत नसल्यास अथवा उमेदवारांचे प्रमाणपत्र, कागदपत्र खोटे अथवा बनावट आढळून आल्यास अथवा उमेदवाराने मूळ प्रमाणपत्रे, कागदपत्रे सादर न केल्यास उमेदवारास अंतिम निवडसूची (Final Selection List) करिता अपात्र ठरविण्यात येईल व त्याबाबत उमेदवाराची कोणतेही तक्रार विचारात घेतली जाणार नाही. तद्नंतर अंतिम निवडसूची (Final Selection List) संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

१५.११ **निवडसूचीची कालमर्यादा:-** निवड समितीने तयार केलेली निवडसूची १ वर्षासाठी किंवा निवडसूची तयार करताना ज्या दिनांकापर्यंतची रिक्त पदे विचारात घेण्यात आली आहेत त्या दिनांकापर्यंत, यापैकी जे नंतर घडेल त्या दिनांकापर्यंत विधीग्राहय राहील. त्यानंतर ही निवडसूची व्यपगत होईल. (सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक प्रानिमं-१२२२/प्र.क्र.५४/का-१३-अ, दिनांक ४.५.२०२२ व त्यानुषंगाने राज्य शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णय/शुध्दीपत्रक/परिपत्रक इत्यादी)

१५.१२ सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक प्रानिमं-१२२२/प्र.क्र.५४/का-१३-अ, दिनांक ४.५.२०२२ नुसार गट-क मधील पदांकरीता मुलाखती घेण्यात येणार नाही.

१५.१३ पदभरती संदर्भातील सर्व माहिती वेळोवेळी https://dgps.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. या संदर्भात उमेदवारांशी अन्य कोणताही पत्रव्यवहार करण्यात येणार नाही. त्यामुळे सदर कालावधीत उमेदवाराने नियमितपणे https://dgps.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर पदभरती संदर्भातील सूचनांचे वेळोवेळी अवलोकन करण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

१५.१४ संपूर्ण पदभरती प्रक्रियेस उमेदवाराने स्वखर्चाने उपस्थित राहणे आवश्यक राहील.

१६ **परीक्षा शुल्क:-** उमेदवार त्यांच्या शैक्षणिक अर्हता व अनुभवानुसार ज्या पदाकरिता प्रथमदर्शनी पात्र ठरत असेल त्या पदांपैकी कोणत्या पदाच्या पदभरतीकरिता सहभागी व्हायचे याचा सर्वस्वी निर्णय उमेदवारांचा राहील. उमेदवार प्रथमदर्शनी ज्या पदाकरिता पात्र ठरत असेल व त्या पदाकरिता उमेदवाराने अर्ज/आवश्यक परीक्षा शुल्क (NonRefundable) न भरल्यास/ परीक्षेस उपस्थित न राहिल्यास सदर पदाकरिता उमेदवाराच्या नावाचा विचार केला जाणार नाही तसेच या संदर्भात उमेदवाराची कोणतीही विनंती/अभिवेदन/अर्ज मान्य केले जाणार नाहीत अथवा संधी उपलब्ध करुन दिली जाणार नाही याची उमेदवाराने नोंद घ्यावी.

**१६.१ परीक्षा शुल्क:-**

i) अमागास प्रवर्गातून अर्ज करणाऱ्या उमेदवारांकरिता परीक्षा शुल्क रु. १०००/- (रुपये एक हजार फक्त) इतके राहील. मागासवर्गीय उमेदवारांकरिता परीक्षा शुल्क रु. ९००/- (रुपये नऊशे फक्त) इतके राहील. (सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. प्रानिमं १२२३/प्र.क्र.१४/का.१३-अ, दिनांक १४.२.२०२३) माजी सैनिकांकरिता परीक्षा शुल्क लागू राहणार नाही.

ii) उमेदवारास ज्या पदांकरिता अर्ज करावयाचा असेल त्या प्रत्येक पदाकरिता उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरणे आवश्यक राहील.

iii) उमेदवारास त्यांच्या शैक्षणिक अर्हता व अनुभवानुसार एक/एकापेक्षा जास्त पदांकरिता अर्ज करता येईल.

iv) उमेदवाराने एकापेक्षा जास्त पदांकरिता अर्ज केला असल्यास त्यास प्रत्येक पदाकरिता परीक्षा शुल्क जमा करावे लागेल.

१६.२ परीक्षा शुल्क ऑनलाईन पध्दतीने स्वीकारण्यात येईल. ऑनलाईन पध्दती व्यतिरिक्त अन्य कोणत्याही मार्गाने शुल्क स्विकारण्यात येणार नाही. परीक्षा शुल्कावर Payment Gateway शुल्क अतिरिक्त लागू राहील.

१६.३ कोणत्याही कारणास्तव पदभरती प्रक्रिया स्थगित/रद्द झाल्यास परीक्षा शुल्क उमेदवारास परत करण्यात येणार नाही.

१७ **ऑनलाईन अर्ज प्रक्रिया:-**

१७.१ उमेदवारांनी दिनांक ९ फेब्रुवारी, २०२४ सकाळी ११.०० वाजता ते दिनांक २९ फेब्रुवारी, २०२४ रात्रौ ११.५५ पर्यंत या कालावधीत https://dgps.maharashtra.gov.in या विभागाच्या संकेतस्थळावरील **महत्वाची सूचना या** TAB वर दिलेल्या जाहिरातीमधील लिंकद्वारे ऑनलाईन आवेदनपत्र सादर करणे आवश्यक राहील. कोणत्याही परिस्थितीत हस्तदेय/टपाल/ कुरीअर इत्यादीद्वारे ऑफलाईन पध्दतीने तसेच ई-मेल अथवा अन्य ऑनलाईन पध्दतीने प्राप्त झालेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

१७.२ सेवायोजन कार्यालये/समाज कल्याण विभाग/आदिवासी विकास विभाग/जिल्हा सैनिक बोर्ड/अपंग कल्याण कार्यालये इत्यादीमध्ये नांव नोंदणी केलेल्या तसेच प्रकल्पग्रस्त/ भूकंपग्रस्त/अंशकालीन पदवी/पदविकाधारक उमेदवारांनी देखील ऑनलाईन अर्ज सादर करणे आवश्यक राहील.

१७.३ ऑनलाईन अर्ज करण्याकरिता उमेदवाराने MoZilla Firefox/Google Chrome/Microsoft Edge या Browsers चा वापर करावा.

१७.४ Application Link वर Clik करुन उमेदवारास त्यांचे नाव, नावांत बदल झाला असल्यास त्याचा तपशील, जन्मतारीख, मोबाईल क्रमांक, E-mail ID इत्यादी प्राथमिक माहिती भरुन प्रथम नोंदणी करणे आवश्यक राहील.

१७.५ नोंदणी झाल्यानंतर प्राप्त झालेल्या User ID व Password द्वारे Log in केल्यानंतर उमेदवारास वैयक्तिक माहिती (Personal Details)] अतिरिक्त माहिती (Additional Details) तसेच शैक्षणिक अर्हता व अनुभव यांचा तपशील भरण्याकरिता उपलब्ध होईल. सदर पदभरतीच्या अनुषंगाने पुढील सर्व कार्यवाहीकरिता उमेदवाराने त्याचा User ID व Password जतन करुन ठेवणे आवश्यक राहील.

१७.६ उमेदवाराने ऑनलाईन अर्जाकरिता स्वत:चा फोटो (Colour with White background, File size 80-200 KB, 200 dpi, JPG/JPEG format photo size 3.5 cm. x 4.5 cm.) (फोटो ६ महिन्यापेक्षा जास्त कालावधीपूर्वीचा नसावा), स्वाक्षरी (File size 80-200 KB, JPG/JPEG format) शैक्षणिक अर्हता व अनुभवाची प्रमाणपत्रे, जात प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र, अधिवासाचा दाखला, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, अनाथ, दिव्यांग, खेळाडू, माजी सैनिक या संदर्भातील दाखले, प्रमाणपत्रे ओळखपत्र व इतर अनुषंगीक प्रमाणपत्रे (File Size 100 KB- 2 MB, JPG, JPEG and PDF Format) ऑनलाईन अर्जासोबत अपलोड करणे आवश्यक राहील.

१७.७ उमेदवाराने -संपूर्ण अर्ज भरुन त्यासोबत आवश्यक प्रमाणपत्र/दाखले इत्यादी अपलोड केल्यानंतर आवश्यक ते पदभरती परीक्षा शुल्क ऑनलाईन पध्दतीने विहित मुदतीत /वेळेत अदा करणे आवश्यक राहील. पदभरती परीक्षा शुल्क अदा केल्यानंतर Payment Transaction Successful झाले असल्याबाबतची खातरजमा करण्याची सर्वस्वी जबाबदारी उमेदवाराची राहील. Payment Transaction Successful झाल्यानंतरच उमेदवाराचा अर्ज अंतिम समजण्यात येईल. तद्नंतर उमेदवारास अर्जात कोणताही बदल करता येणार नाही.

१७.८ उमेदवारास अर्जात नमूद केलेल्या माहितीच्या आधारे मूळ प्रमाणपत्र पडताळणीच्या अधीन राहून पदभरती प्रक्रियेत सहभागी होण्यास परवानगी देण्यात येईल. उमेदवारास पदभरती प्रक्रियेत सहभागी होण्यास परवानगी दिली याचा अर्थ उमेदवार पात्र आहे असे नाही. पदभरतीच्या कोणत्याही टप्प्यावर उमेदवाराने सादर केलेली माहिती चुकीची/खोटी आढळून आल्यास किंवा उमेदवाराने पदभरती प्रक्रियेत कोणतेही गैरवर्तन केल्यास किंवा कोणत्याही प्रकारचा दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास त्यास पदभरती प्रक्रियेत सहभागी होण्याकरिता तात्काळ अपात्र ठरविण्यात येईल.

१७.९ लेखी परीक्षा तसेच व्यावसायिक चाचणी परीक्षेकरिता उपस्थित राहण्याकरिता उमेदवाराकडे शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई या कार्यालयाने निर्गमित केलेले अधिकृत प्रवेशपत्र (Admit Card) असणे आवश्यक राहील. प्रवेशपत्राशिवाय उमेदवारास परीक्षेस उपस्थित राहण्याची परवानगी देण्यात येणार नाही. उमेदवारांना लेखी परीक्षा तसेच व्यावसायिक चाचणी परीक्षेचे प्रवेशपत्र (Admit Card) प्राप्त करुन घेण्यासाठी उमेदवारांना E-mail/S.M.S. द्वारे लिंक पाठविण्यात येईल. उमेदवाराने सदर लिंकचा वापर करुन संकेतस्थळावरुन प्रवेशपत्र (Admit Card) डाऊनलोड करुन घेणे आवश्यक राहील. प्रवेशपत्राबाबत (Admit Card) उमेदवारांशी कोणताही पत्रव्यवहार करण्यात येणार नाही.

१७.१० पदभरती संदर्भातील माहिती वेळोवेळी https://dgps.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उमेदवारांकरिता प्रसिध्द करण्यात येईल. तसेच लेखी परीक्षा व व्यावसायिक चाचणीसंदर्भात उमेदवारास वेळोवेळी त्याने User ID व Password तयार करताना दिलेल्या E-mail ID/मोबाईल क्रमांकावर E-mail/S.M.S. द्वारे कळविण्यात येईल. या संदर्भात कोणताही पत्रव्यवहार करण्यात येणार नाही.

१७.११ लेखी परीक्षेचे आयोजन सर्वसाधारणपणे जिल्हा स्तरावर करण्यात येईल. तथापि, पदभरतीकरिता प्राप्त अर्ज विचारात घेऊन परीक्षेचे ठिकाण निश्चित करण्याचे/बदल करण्याचे अधिकार व्यवस्थापक तथा अध्यक्ष, प्रादेशिक निवड समिती, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई-०४ यांना राहतील.

१७.१२ व्यावसायिक चाचणी परीक्षेचे आयोजन व्यवसायिक चाचणी परीक्षेकरीता पात्र ठरणाऱ्या उमेदवारांची संख्या विचारात घेऊन व्यावसायिक परीक्षा केंद्र स्वतंत्रपणे निश्चित करण्यात येईल.

१८ **सेवाप्रवेशोत्तर शर्ती:-**

नियुक्त झालेल्या व्यक्तीस खालील अर्हता/परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील:-

१. जेथे प्रचलित नियमानुसार विभागीय/व्यावसायिक परीक्षा विहित केली असेल अथवा आवश्यक असेल तेथे त्यासंबंधी केलेल्या नियमानुसार विभागीय/ व्यावसायिक परीक्षा.

२. हिंदी आणि मराठी परीक्षेसंबंधी केलेल्या नियमानुसार जर ती व्यक्ती अगोदर परीक्षा उत्तीर्ण झाली नसेल किंवा तिला उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसेल तर ती परीक्षा.

३. महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेले संगणक हाताळणीबाबतची प्रमाणपत्र परीक्षा.

१९ **प्रशिक्षण:-** निवड झालेल्या उमेदवाराने संबंधित पदांकरिता वेळोवेळी विहित केलेले प्रशिक्षण विहित कालमर्यादेत पूर्ण करणे आवश्यक राहील.

२० सदर संपूर्ण पदभरती प्रक्रिया ही शासनाने पदभरती संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेले नियम, आदेश निर्णय इत्यादी मधील तरतूदीनुसार करण्यात येईल.

२१ संपूर्ण पदभरती प्रक्रियेबाबतचा तपशील वेळोवेळी https://dgps.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. त्यामुळे उमेदवारांनी पदभरतीच्या काळात पदभरतीसंदर्भात संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली माहिती नियमितपणे पाहणे आवश्यक आहे. संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली माहिती उमेदवाराने न पाहिल्यास व त्यामुळे उमेदवारास पदभरती संदर्भात कोणतीही अडचण उद्भवल्यास उमेदवाराची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

२२ सदर पदभरतीच्या अनुषंगाने कोणीही आर्थिक/इतर स्वरुपाची मागणी केल्यास उमेदवाराने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य (Anti-Corruption Bureau, Maharashtra State) यांचेकडे १०६४ या हेल्पलाईन क्रमांकांवर अथवा acbmaharashtra.net या मोबाईल ॲपद्वारे तक्रार नोंदवावी.

२३ ऑनलाईन अर्ज भरण्यासंदर्भात मदतीकरिता दूरध्वनीद्वारे Helpdesk No. ०२२-२३६३१७३३ व ०२२-२३६३१४३३ विस्तारित क्र. २२५ वर सोमवार ते शुक्रवार सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० या कालावधीत संपर्क साधावा अथवा ई-मेल : gcp.mumbai@maharashtra.gov.in वर आपणास हव्या असलेल्या मदतीचा तपशील कळवावा.

**टीप :-**

१. पदांची संख्या, प्रवर्गनिहाय पदसंख्या, परीक्षा कोणत्याही टप्प्यावर स्थगित करणे, रद्द करणे, अशंत: बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार (अध्यक्ष प्रादेशिक निवड समिती) यांना राहतील. याबाबत कोणालाही कोणताही वाद उपस्थित करता येणार नाही.

२. सदर भरतीच्या नियम/निकषांमध्ये भरती पूर्ण होईपर्यंत शासन अधिसूचना/शासन निर्णय/ शासन परिपत्रक/ पत्रानुसार बदल झाल्यास त्या-त्या प्रमाणे कार्यवाही करण्यात येईल. ती सर्वांवर बंधनकार राहील.

३. पाळी निहाय काम करावे लागेल.

स्वाक्षरीत/-
(मि. शां. शिंदे)
व्यवस्थापक,
तथा
अध्यक्ष, प्रादेशिक निवड समिती,
शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई-०४.